Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

मुंबई, शुक्रवार, १९ ऑक्टोबर २०१८

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान कमाल ३२° सें किमान २६° सें

हवामानाचा अंदाज

तुरळक पावसाची शक्यता.

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

## ‘शिवकृपा’ला दीपस्तंभ पुरस्कार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा वर्ष २०१८ चा राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार शिवकृपा सहकारी पतपेढीने पटकावला आहे.

सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चेरगावकर, सहकार आयुक्त सतीश सोनी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार शिवकृपाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक चंद्रकांत वंजारी यांनी स्वीकारला. सप्टेंबर २०१८ अखेर ३,२५६ कोटी रुपयांचा संमिश्र व्यवसाय असलेल्या संस्थेने पतसंस्था फेडरेशनचा ‘राज्यातील सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था’ तसेच २०१६चा ‘बँको पतसंस्था’ पुरस्कार पटकावला आहे. शिवकृपाच्या दहिसर आणि विश्रांतवाडी ही नवीन शाखा कार्यालये लवकरच कार्यान्वित होत आहेत.